# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
मेल : estt6mjp@gmail.com

---

जा.क्र.मजीप्रा-२०२४/प्र.क्र.७/आ-६/८९ दिनांक :- ०८/१०/२०२४

म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) (पदवीधर) या पदोन्नतीच्या ४०% कोटयातील रिक्त पदांवर तात्पुरती/तदर्थ पदोन्नती देणेबाबत.

## // आदेश //

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे पत्र क्र.मजीप्रा-११२२/प्र.क्र.२४/पापु-२३, दिनांक २८.६.२०२४ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्था) यांना उप अभियंता (स्था) पदी तदर्थ पदोन्नती देण्यास मान्यता दिली आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ मधील तरतुदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७/५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले खालील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना रुपये S-२०: ५६१००-१७७५००/- या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने उप अभियंता (स्थापत्य) (पदवीधर) या पदोन्नतीच्या ४०% कोटयात पदोन्नती देऊन त्यांचे नावासमोर रकाना क्र.४ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

.. २/-

| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | 23/10 |
| शाखा | आय.टी. सेल |
| आवक क्र. | 2024350566 |
| दिनांक:- | 25/10/24 |

Publish.

१. खालील विवरणपत्रात नमुद केलेल्या सहाय्यक अभियंत्यांना श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (पदवीधर) या पदोन्नतीच्या ४०% कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहा.अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीमती वैशाली धनपाल कोले (श्रीमती व्ही.ए.गाडवे) | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, सातारा | म.जी.प्रा. मंडळ, पुणे | रिक्तपदी |
| २ | श्रीमती माया माधवराव सोनकुसळे (श्रीमती माया दिलीप पाठराबे) | म.जी.प्रा. मंडळ, नागपूर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.४, नागपुर | रिक्तपदी |
| ३ | श्रीमती महादेवी शिवरुद्रप्पा केवळराव (श्रीमती होनराव) | म.जी.प्रा. उपविभाग, धाराशिव | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, लातूर, जि.प., लातूर | रिक्तपदी |
| ४ | श्रीमती सुनिता मधुकरराव रेंगे | म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपूर | मुख्य अभियंता कार्यालय, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपुर | रिक्तपदी |
| ५ | श्रीमती सुचित्रा बापुराव कुलकर्णी (श्रीमती सुचित्रा गिरीश जामदार) | म.जी.प्रा. मंडळ, पुणे | म.जी.प्रा. विभाग क्र.१, पुणे | रिक्तपदी |
| ६ | श्रीमती रुपाली संतोष पायस | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, नवीन पनवेल | म.जी.प्रा.म.नि.सं.सं.कक्ष, मुंबई | रिक्तपदी |
| ७ | श्रीमती शिवाली प्रभाकर नलावडे (श्रीमती एस.पी.नरेवाडीकर) | म.जी.प्रा. विभाग, कोल्हापूर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, वैभववाडी, जि.प., सिंधुदुर्ग | रिक्तपदी |

२. खालील विवरणपत्रात नमुद केलेल्या सहाय्यक अभियंत्यांना श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (नामनिर्देश) या २०% कोटयात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहा.अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीमती विद्या वासुदेवराव गोतमारे (श्रीमती विद्या संदिप हरनाल) | म.जी.प्रा. ज.व्य. विभाग, नागपूर | म.जी.प्रा. जलव्यवस्थापन विभाग, नागपुर | रिक्तपदी |
| २ | श्रीमती वैशाली ईश्वरसिंग पाटील | म.जी.प्रा. मंडळ, नाशिक | मुख्य अभियंता कार्यालय, म.जी.प्रा. प्रा. वि., नाशिक | रिक्तपदी |
| ३ | श्री.सचिन जयराम गोमासे | म.जी.प्रा. विभाग, नाशिक | म.जी.प्रा. जलव्यवस्थापन उपविभाग क्र.३, नाशिक | रिक्तपदी |
| ४ | श्री.चंद्रशेखर नारायण धामणकर | म.जी.प्रा. उपविभाग, सिन्नर | म.जी.प्रा. विभाग, छत्रपती संभाजीनगर | रिक्तपदी |

| अ. क्र. | सहा.अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ५ | श्री.कासीम नूरमहंमद नदाफ (अपंग) | म.जी.प्रा. उपविभाग क्र.२, सोलापूर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, सोलापूर | श्री.नलावडे यांचे दि.३१.१०.२०२४ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदी |
| ६ | श्री.सचिन शामराव मेटकरी | म.जी.प्रा.एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई | म.जी.प्रा. मंडळ, अमरावती | रिक्तपदी |
| ७ | श्री.अरविंद देविदास सिद्राल | म.जी.प्रा. विभाग, सोलापूर | ग्रा.पा.पु. उपविभाग, तुळजापूर, जि.प., धाराशिव | रिक्तपदी |
| ८ | श्री.स्वप्निल आशानाथ शेंडे | म.जी.प्रा. विभाग, नागपूर | म.जी.प्रा. उपविभाग क्र.१, अमरावती | रिक्तपदी |
| ९ | श्री.मनोहर बा.चौधरी (अपंग) | म.जी.प्रा. उपविभाग, जळगांव | म.जी.प्रा. विभाग, जळगांव | रिक्तपदी |

३. वरील विवरणपत्रातील सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य) या पदोन्नतीच्या २०% कोटयात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार केवळ तात्पुरती/तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) वरील अभियंता यांना उप अभियंता (स्थापत्य) या पदावर दिलेली तात्पुरती/तदर्थ पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ अनुसार तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या/तदर्थ स्वरूपात दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवा ज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

ब) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा उप अभियंता (स्थापत्य) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क) उपरोक्त तात्पुरती/तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांच्या सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

ड) सदर अभियंत्यांची उप अभियंता (स्थापत्य) पदावरील तात्पुरती/तदर्थ पदोन्नती ही सदर अभियंत्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

इ) वरील परिच्छेद क्र.२ (२) मध्ये नमुद सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांना त्यांनी लिहून दिलेल्या बंधपत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशन कोटयातील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर दिलेली तदर्थ पदोन्नती असून ही तदर्थ पदोन्नती केवळ ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंत असेल. आयोगाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर सदर तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

४. तात्पुरती/तदर्थ पदोन्नत अभियंत्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी १ महिन्याच्या आत रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास सादर करावा. तात्पुरती/तदर्थ पदोन्नत अधिकाऱ्यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष्य सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

५. संबंधीत सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांनी उप अभियंता (स्थापत्य) पदी दिलेली तात्पुरती/तदर्थ पदोन्नती स्वीकृत न केल्यास, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.वेतन/१९९९/प्र.क्र.२/९९/ सेवा-३, दिनांक २०.७.२००१ अन्वये संबंधीतास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा म्हणजेच उप अभियंता (स्थापत्य) पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला असेल तर सदर लाभ काढून घेण्यात येईल. या अनुषंगाने पदोन्नती स्वीकृत न करणारे सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) यांचे प्रकरणी संबंधीत कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

सदस्य सचिव यांचे मान्यतेने.

(दिपाली देशपांडे सविडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत : माहितीस्तव.**

- मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव.
- मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
- मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधूदुर्ग /लातूर/ /धाराशिव
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपुर.

- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्यालय, मुंबई/गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन/म.नि.स.स.कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/ नाशिक/अहमदनगर/जळगांव/ छत्रपती संभाजीनगर/नांदेड/लातूर/अमरावती/अकोला/नागपुर/चंद्रपुर
- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, ------
- कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.जि.प.विभाग, ---------
- उप अभियंता, म.जी.प्रा. आय.टी.सेल, सिडको भवन, नवी मुंबई
- कक्ष अधिकारी, आस्था-१ (उविअ)/आस्था-२ (विचौ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- संबंधीत पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य)
- कार्यालयीन आदेश धारिका.